# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः11.08.2024** **वारःरविवार**

---

•फिजी, न्यूझीलंड, तिमोर या देशांच्या यशस्वी दौऱ्यात राष्ट्रपतींकडून तीन सामंजस्य करारावर स्वाक्षरी
•पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत उच्चउत्पादक, हवामानबदलांवर मात करू शकणारे आणि उच्च पोषणमूल्य असलेले, पिकांचे १०९ वाण सादर करणार.
•इथेनॉल उत्पादनासाठी भविष्यवेधी दृष्टिकोन अवलंबण्याचं केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांचं आवाहन.
•माजी परराष्ट्रमंत्री के. नटवरसिंग यांचं दिल्लीत काल दीर्घ आजारानं निधन
आणि
•पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू विनेश फोगटच्या अपात्रतेविरुद्धच्या याचिकेवरील निर्णय येत्या मंगळवारपर्यंत लांबणीवर. सहा पदकांसह भारताची मोहीम पूर्ण.

राष्ट्रपती-तिमोर
फिजी, न्यूझीलंड आणि तिमोर लेस्टे या तीन देशांचा दौरा केल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दिल्लीत परतण्यासाठी रवाना झाल्या आहेत. अंतिम टप्प्यावर, राष्ट्रपतींनी पूर्व तिमोरच्या दौऱ्यात त्या देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार - ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्टेने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर राष्ट्रपतींनी काल राजधानी दिली इथं तिमोर-लेस्टेचे राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांनी परस्पर सहकार्यासाठी तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. तिमोर-लेस्टेचे अध्यक्ष जोस रामोस-होर्टा यांनी राष्ट्रपती मुर्मू यांच्या सन्मानार्थ मेजवानीचे आयोजन केले होते. या दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी परस्पर संबंध दृढ करण्यावर भर दिला.

पीक-प्रजाती
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत १०९ उच्च उत्पादक, हवामानबदलांवर मात करू शकणाऱ्यां आणि उच्च पोषणमूल्य असलेल्या पिकांचे वाण सादर करणार आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधान शेतकरी आणि शास्त्रज्ञांशी संवादही साधणार आहेत. ६१ पिकांचे हे १०९ वाण आहेत. त्यात ३४ शेतीशी संबंधित आणि २४ फलोत्पादनाशी संबंधित पिकांचा समावेश आहे, असं पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. भरडधान्यं, तेलबिया, डाळी, ऊस, कापूस, वैरण या पिकांचे नवीन वाण सादर केले जाणार आहेत. वेगवेगळी फळं, भाज्या, फुलं आणि औषधी वनस्पतींचेही नवीन वाण सादर केले जाणार आहेत.

पंतप्रधान-वायनाड
संपूर्ण देश आणि केंद्र सरकार केरळमध्ये वायनाडमधील भूस्खलनामुळे बाधितांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. पंतप्रधानांनी काल भूस्खलनामुळे बाधित झालेल्या भागाची पाहणी दिली आणि या दुर्घटनेत बचावलेल्यांची भेट घेतली. त्यानंतर वायनाड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. मदतीसाठीच्या प्रयत्नांत राज्य सरकारला सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. याबाबत ज्या

ज्या गोष्टी आवश्यक असतील, त्याबाबत केरळच्या मुख्यमंत्र्यांनी तपशीलवार यादी पाठवून द्यावी आणि त्याचा अनुकूल विचार केला जाईल, असं ते म्हणाले. या आपत्तीमुळे बाधित विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी राज्य सरकारनं दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचीही सूचना त्यांनी राज्य सरकारला केली.

शहा-इथेनॉल
इथेनॉल उत्पादनासाठी उसाबरोबरच मका, भात, वाया जाणारी फळं, बांबू यांच्यासारख्या घटकांचा वापर करून भविष्यवेधी आणि बहुपैलू दृष्टिकोन अवलंबावा असं आवाहन केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शहा यांनी काल केलं. नवी दिल्लीत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. इथेनॉलचं उत्पादन हा नफा मिळवून देणारा आणि उत्तम व्यवसाय असून,

पेट्रोलमध्ये जैवइंधन म्हणून इथेनॉलचं मिश्रण करण्याची मर्यादा सरकार २६ टक्क्यांपर्यंत वाढवत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. २०३०पर्यंत पेट्रोलमध्ये इथेनॉलचं मिश्रण वीस टक्क्यांपर्यंत नेण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे आणि ते त्याच्याआधीच साध्य होईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

वक्फ सुधारणा विधेयक
वक्फ सुधारणा विधेयक २०२४चा आढावा घेण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्यात आली असून, ही समिती संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत आपला अहवाल देईल, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. समाजमाध्यमांवरच्या संवादात ते बोलत होते. या प्रकरणी सुनावणीची तारीख संयुक्त संसदीय समिती जाहीर करेल आणि फक्त मुस्लिम संघटना नव्हे तर या प्रकरणी सकारात्मक योगदान देऊ शकणाऱ्या कोणत्याही संघटना किंवा व्यक्तींचं समितीच्या प्रक्रियेत स्वागत असेल, असं रिजिजू म्हणाले. हे विधेयक भविष्यवेधी असून, मुस्लिम समुदायाच्या कल्याणासाठी सरकारनं हे पाऊल उचलल्याचं ते म्हणाले.

जम्मूकाश्मिरविक्रम
जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात काल 'कशूर रिवाज' सांस्कृतिक महोत्सवात 10,000 तरुणींनी काल सादर केलेल्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या काश्मिरी लोकनृत्यामध्ये सहभाग घेवून जागतिक विक्रम केला आहे. युनिव्हर्सल रेकॉर्ड फोरममध्ये या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. 78 व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेलं हे आतापर्यंतचे सर्वात मोठे काश्मिरी लोकनृत्य होते. बारामुल्ला जिल्हा प्रशासन आणि इंद्राणी बालन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिनार कोरच्या डॅगर डिव्हिजनने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कॅबिनेट-सचिव
मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं कॅबिनेट सचिव म्हणून टी. व्ही. सोमनाथन यांच्या नियुक्तीला काल मंजुरी दिली. सोमनाथन तीस ऑगस्टपासून रुजू होणार असून, त्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. ते भारतीय प्रशासन सेवेच्या १९८७च्या तुकडीचे अधिकारी आहेत. कॅबिनेट सचिवालयाचे अधिकारी म्हणूनही त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पंतप्रधान-वायनाड
संपूर्ण देश आणि केंद्र सरकार केरळमध्ये वायनाडमधील भूस्खलनामुळे बाधितांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. पंतप्रधानांनी काल भूस्खलनामुळे बाधित झालेल्या भागाची पाहणी दिली आणि या दुर्घटनेत बचावलेल्यांची भेट घेतली. त्यानंतर वायनाड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

मदतीसाठीच्या प्रयत्नांत राज्य सरकारला सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. याबाबत ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतील, त्याबाबत केरळच्या मुख्यमंत्र्यांनी तपशीलवार यादी पाठवून द्यावी आणि त्याचा अनुकूल विचार केला जाईल, असं ते म्हणाले. या आपत्तीमुळे बाधित विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी राज्य सरकारनं दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचीही सूचना त्यांनी राज्य सरकारला केली.

सेबी प्रमुख

सेबी अर्थात भारतीय प्रतिभूति और विनिमय बोर्डच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी अमेरिकेतील गुंतवणूक आणि संशोधन संस्था हिंडेनबर्गकडून करण्यात आलेल्या आरोपांचे खंडन केलं आहे. या दांपत्याचे अदानी ग्रुपशी संबंधित ऑफ-शोअर संस्थांमध्ये सहभाग असल्याचा आरोप कंपनीने केला आहे. धवल बुच यांनी या संदर्भात एक निवेदन दिलं असून ; त्यांचे जीवन आणि उत्पन्न आधीच सार्वजनिक असून गेल्या काही वर्षांत आवश्यक कागदपत्रे सेबीकडे जमा करण्यात आली असल्याचं त्या निवेदनात म्हटलं आहे. भविष्यात कोणत्याही प्रकारचे आर्थिक दस्तऐवज सार्वजनिक करण्यात त्यांना कोणताही संकोच वाटणार नाही. आर्थिक कागदपत्रांसह इतर कागदपत्रांची चौकशी करण्यास आमची हरकत नसल्याचं या दांपत्याने म्हटलं आहे.

उपग्रह सहकार्य करार

नेपाळच्या मुनाल उपग्रहाच्या प्रक्षेपणासाठी मदतीबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि न्यूस्पेस इंडिया लिमिटेड यांच्यात काल संयुक्त सहकार्य करार करण्यात आला. मुनाल हा नेपाळमध्ये विकसित झालेला उपग्रह आहे. नेपाळच्या विद्यार्थ्यांना त्याची रचना आणि बांधणी केली असून, एपीएन या नेपाळी अवकाश कंपनीनं त्यासाठी त्यांना मदत केली आहे.

विजय-कदम-निधन

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं काल सकाळी त्यांच्या राहत्या घरी मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते. विजय कदम यांनी अनेक चित्रपट, नाटक, मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. टूरटूर; विच्छा माझी पुरी करा; पप्पा सांगा कुणाचे; अशा अनेक गाजलेल्या नाटकांमधून, तर गोट्या, दामिनी, घडलंय बिघडलंय अशा मालिकांमधून त्यांनी भूमिका केल्या होत्या.

नटवर सिंहनिधन

माजी परराष्ट्र मंत्री के नटवर सिंग यांचे काल रात्री दिल्लीजवळील गुरुग्राममध्ये दीर्घ आजाराने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज दिल्लीत अंत्यसंस्कार होणार असल्याचे कौटुंबिक सूत्रांनी सांगितले. नटवर सिंह यांचा जन्म 1931 मध्ये राजस्थानच्या भरतपूर जिल्ह्यात झाला. 1984 मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नटवर सिंग यांनी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत.

विनेश फोगट

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये, क्रीडा लवादाने भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगटच्या अपात्रतेविरुद्धच्या याचिकेवरील निर्णय येत्या मंगळवारपर्यंत पुढे ढकलला आहे.

एकसदस्यीय लवाद, डॉ. ॲनाबेले बेनेट, यांना निकाल देण्यासाठी मंगळवारी भारतीय वेळेनुसार रात्री साडेनऊ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विनेश फोगटने लवादाकडे केलेल्या अर्जात संयुक्त रौप्य पदकाची विनंती केली आहे.

ऑलिंपिक पदक

2024 पॅरिस ऑलिम्पिकमधील भारताच्या मोहिमेचा काल स्पर्धेच्या अंतिम दिवशी एकंदर  सहा पदकांसह अधिकृतपणे समारोप झाला. काल झालेल्या स्पर्धेत कुस्तीपटू रीतीका हुडा, उपांत्यपूर्व फेरीतील पराभवानंतर महिलांच्या 76 किलो वजनी गटाच्या स्पर्धेतून बाहेर पडली, तर गोल्फपटू अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांना पराभवानंतर बाहेर पडावं लागलं. पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सेहरावतनं मिळवलेलं कुस्तीतलं एकमेव कांस्यपदक भारताच्या पदकतालिकेतलं शेवटचं पदक ठरलं. एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह एकंदर सहा पदकं भारतानं मिळवली आहेत.

अभिनव बिंद्रा

भारताचा पहिला वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्रा याला काल पॅरिसमध्ये आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडून प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर हा सन्मान प्रदान करण्यात आला.

ऑलिम्पिक ऑर्डर हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडून दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. ऑलिम्पिकमधील योगदानाची दखल घेत अभिनव बिंद्रा यांना सन्मानित करण्यात आलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.